International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मराठी संत साहित्यातील कृषिदर्शन

**प्रा. हरिभजन राम कांबळे**

*कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त) जि.सोलापूर*

*Corresponding Author – प्रा. हरिभजन राम कांबळे*

**DOI - 10.5281/zenodo.18654386**

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारतातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सामाजिक सुधारणा चळवळ होती, जी ७ व्या ते १७ व्या शतकात दक्षिण भारतातून सुरू झाली आणि देशभरात पसरली, ज्याने कर्मकांडांना विरोध करून जातिव्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवला आणि सामाजिक समानतेचा पुरस्कार केला. तसेच या चळवळीने धार्मिक सुधारणा घडवून आणल्या आणि अध्यात्म सर्वसामान्यांसाठी खुले केले. यामुळे सामाजिक समता आणि बंधुत्वाची भावना वाढीस लागली.

संतांनी त्यांच्या अभंगातून आणि साहित्यातून निसर्गावर प्रेम, पंचमहाभूतांचा आदर, वृक्ष, पक्षी, प्राणी यांना सोबत घेऊन निसर्गाशी एकरूप होणे, यासारख्या पर्यावरणपूरक विचारांचा प्रसार केला. ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताबाई आणि रामदास यासारख्या संतांनी निसर्गाला ब्रम्हरूप म्हणून पर्यावरणाचे महत्व पटवून दिले, त्यांच्या साहित्यातून निसर्गाचे सौंदर्य, त्याचे रक्षण आणि मानवी जीवनावर पर्यावरणाचा होणारा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. जो आजच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. संत साहित्य केवळ आध्यात्मिक नसून ते एक 'पर्यावरणीय साहित्य' आहे, जे आपल्याला निसर्गाशी जोडते आणि त्याचे रक्षण करण्याची शिकवण देते. ज्याप्रमाणे संत साहित्याचा पर्यावरणाशी संबंध आहे त्याचप्रमाणे संत साहित्य आणि शेती यांचाही संबंध आहे.

संतानी शेतीला केवळ उदरनिर्वाहाचे साधन न मानता अध्यात्मिक साधना मानले. संत तुकाराम, सावता माळी, संत नामदेव यासारख्या संतांनी आपल्या अभंगातून शेतीतील कष्ट, मातीशी असलेले नाते, निसर्गाचे चक्र यांचे चित्रण केले आहे. तसेच शेतीतही परमेश्वर शोधण्याची शिकवण दिली आहे, ज्यामुळे शेती ही एक पवित्र आणि मोक्षप्राप्तीची वाट बनली आहे. संतांनी शेती आणि निसर्गाला अविभाज्य मानले. थोडक्यात संत साहित्यातील शेतीदर्शन हे केवळ शेतीचे वर्णन नसून ती मातीशी जोडलेले, निसर्गावर प्रेम करणारे आणि श्रमातून समाधान शोधणारे एक जीवनदर्शन आहे.

मराठीतील आद्यकवयित्री महादंबा यांनी 'ढवळे'ची रचना केली. 'ढवळे' म्हणजे विवाहाप्रसंगी नवरदेवाविषयी गायचे गीत. शेती संस्कृतीत लग्नासारख्या विधीला अनन्यसाधारण महत्त्व असते. हळदीच्या वेळी धवळ्यासारखी गीते आजही शेतीसंस्कृतीत गायली जातात. एका ओवीतून शेतकरी जीवनाचे - शेतकऱ्याच्या भोजनाचे चित्रण आले आहे.

माझ्या घराला अभ्यागत राणा |
त्यांच्या भोजनाला केली उत्तर बागवाना |
घराला अभ्यागत आताचा डाळ भात |
बाबाच्या भोजनाला कुंदी करू सारी रात |
घराला अभ्यागत आताची डाळ रोटी |
बागवाना दिली चिट्ठी आंबा उत्तर सख्यासाठी |

सण समारंभाचे वेळी पाहुणे आल्यावर खेड्यात जेवताना ताटात गोडधोड पदार्थ असतात. हे पदार्थ जाणीवपूर्वक केले असतात. त्यात पुरणपोळीसारखा पदार्थ हमखास असतो. सोनसेळा पोळी, सोजीची पोळी, पुरणाची पोळी, गुळाची पोळी, केळाच शिखरण, आंब्याचा रस असतो. शेतकऱ्याच्या ताटातील हे पदार्थ वरील ओवीतून आले आहेत. शिवाय शेती संस्कृतीत बोलली जाणारी बोलीभाषाही या गीतात उतरली आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची पायाभरणी करून सर्वांना भागवत धर्माच्या झेंड्याखाली एकत्र आणले. ऐंशी टक्के लोकसंख्या ज्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे, तो शेती व्यवसाय आणि शेतीशी निगडीत असणारी बोलीभाषा संतांनी आपल्या काव्याच्या केंद्रस्थानी आणली. त्यामुळे त्यांच्या काव्यातून कृषीसंस्कृतीचे समृद्ध दर्शन घडते. शेती व्यवसायातील कामे, पीकपाणी, ऊन, वारा, पाऊस, थंडी, निसर्गातील बदल, झाडे, वेली, प्राणी असे कृषीसंस्कृतीचे अनेक घटक संताच्या काव्यातून आले आहेत.

संत ज्ञानेश्वरांनी शेतकऱ्याकडे खूप भावूकतेने पाहिले आहे. ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी शेती व शेतकऱ्याचे संदर्भ आले आहेत. शेतकरी जीवनाचे वास्तव त्यांच्या कवितेत पहावयास मिळते. गीतेचा तेरावा अध्याय या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

रात्री दिवसा वाहतसे चिंता |
केशवा धडोता | होईन मी ||
खिरजट घोंगडे | फाटके ते कैसे |
वेचिले तैसे | भोगिजे |
वित नाही गाठी | जिवित्वा आटी |
उघडी पाठी | हीव वाजे ||

शेतकरी जीवनाचे आजचे वास्तव सातशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी आपल्या काव्यात मांडले आहे. आयुष्यभर रात्रंदिवस श्रम करूनसुद्धा अंगभर वस्त्र मिळाले नाही. ऊन, वारा, पाऊस, थंडी यामध्ये शेतकरी उघड्यानेच श्रम करतो. फाटक्या घोंगड्याशिवाय त्याच्याजवळ काहीच नसते. शेतकऱ्यांच्या दैन्य, दारिद्र्याचे चित्रण त्यांच्या काव्यात वास्तवपणे आले आहे. किर्तनाने कृषी संस्कृतीचे मनोरंजन केले आहे, तसेच प्रबोधनही केले आहे. नामदेवांनी सुरू केलेली ही कीर्तनाची परंपरा आजही कृषीसंस्कृतीत टिकून आहे. संत नामदेवाच्या काव्यात शेती व्यवसायाचे चित्रण आले आहे.

आम्ही कीर्तन कुळवाडी
आणिक नाही उदीम जोडी
वाचा पिकली पिकली
हरिनामाची वरो आली
एकादशीचे दिवशी
झाल्या कैवल्याच्या राशी
संत म्हणती नामयाला
हरिनामाचा सुकाळ झाला

नामदेवांनी आपल्या अभंगात विठ्ठलावरची उत्कट भक्ती व्यक्त केली आहे. या भक्तीसाठी पीक- पाण्याचा, पिकांच्या अनेक अवस्था त्यांनी रूपकासाठी वापरल्या आहेत. शेती संस्कृतीत नातेसंबंध खूप महत्त्वाचे असतात. नातेसंबंधाचे पावित्र्य शेती संस्कृतीत जपले जाते. संत एकनाथांनी आपल्या काव्यात नातेसंबंध सांगितला आहे.

माझे माहेर पंढरी | आहे भिवरेच्या तीरी ||१ ||
बाप आणि आई | माझी विठ्ठल रखुमाबाई || २ ||
पुंडलिक बंधू आहे | त्याची ख्याती सांगू काय ||३ ||
माझी बहीण चंद्रभागा | करीतसे पाप भंगा ||४ ||
एका जनार्दनी शरण | करी माहेराची आठवण ||५ ||

संत एकनाथांनी विठ्ठल-रुक्मिणी यांना आई-वडिलांच्या रूपात पाहिले आहे. पुंडलिक बंधू तर चंद्रभागा बहीण, अशी नात्याची गुंफण केली आहे.

तुकारामांच्या काव्यातून शेतीविषयक तत्त्वज्ञान व्यक्त झाले आहे. शुद्ध बियाणे, काळी कसदार जमीन, जमिनीतील ओलेपणा, हवामान, श्रम करण्याची अचूक वेळ यांचा सुंदर मिलाफ झाला तर पीक उत्तम येते. जमीन खडकाळ असेल, पेरणी उथळ झाली असेल, बियाणे किडके असतील तर पीक उत्तम येणार नाही शेतकरी आपल्या रानातील दाणेदार टपोरी कणसे बांधून आढ्याला ठेवतो व बियाणे म्हणून पुढच्या वर्षी तो वापरतो. बियाणे शुद्ध असावीत याची तो काळजी घेतो. .

शुद्ध बीजापोटी | फळे रसाळ गोमटी |
मुखी अमृताची वाणी | देह वेचावा कारणी ||

शेतकऱ्याने बियाणे उत्तम वापरली तर पीकही उत्तम येणार. बियाणे शुद्ध असली तर फळेही मधुर रसाळ येणार. गोमट्या बिजाची फळेही अमृतासारखी असतात. ते आतून-बाहेरून सुद्धा असतात. खऱ्या अनुभवी शेतकऱ्याला याची जाण असते. शेती व शेतीविषयक अनेक घटकांचे मार्गदर्शक म्हणून तुकारामांचे अभंग आजही उपयोगी पडतात. या दृष्टीने त्यांचे काव्य खूपच महत्त्वाचे आहे.

ऐसे कुणबीयाचे वाणी
मढे झाकोनी करिती पेरणी

असे संत तुकारामांनी म्हटले आहे. यावरून शेतीचा आणि संताचा किती जवळचा संबंध आहे, हे लक्षात येते. शेती व शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण संतांच्या काव्यात पाहाव्यास मिळते. संत तुकाराम व संत सावता माळी यांची कविता अनुभवातून आल्यामुळे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केले आहेत. संत रामदासांनीही दुष्काळाची तीव्रता आपल्या काव्यात मांडली आहे. शेतीचे अनेक प्रश्न त्यांच्या काव्यातून आले आहेत.

संत कवयित्री जनाबाई यांनी आपल्या श्रमातून विठ्ठलस्मरण केले आहे. अपारश्रम, सहनशीलता, दैववाद ही ग्रामीण स्त्रीची वैशिष्ट्य आहेत. दळण, कांडण, झाडलोट शिवाय शेतीची कामे करीत असताना विठ्ठलाचे स्मरण, चिंतन कृषीसंस्कृतीत चालू असते. विठ्ठलाविषयी अपार श्रद्धा त्यांच्या मनात असते. ग्रामीण स्त्रीच्या मनातील हा भाव जनाबाईच्या काव्यातून दिसून येतो.

झाडलोट करी जनी |
केरभरी चक्रपाणी ||
पाटी घेऊनी डोईवरी |
नेऊनिया टाकी दूरी ||
ऐसा भक्तीसी भुलला |
नीच कामे करू लागला |
जनी म्हणे बा विठ्ठला |
काय उतराई होऊ तुला ||

इथे भक्त व देव असा भेद राहत नाही. संकटाच्या वेळी एकमेकाला मदत करणे हे कृषी संस्कृतीचे वैशिष्ट्ये येथे पहावयास मिळते. संत ज्ञानदेव व संत नामदेव यांच्या समकालीन चोखामेळा हे संत होते. संत चोखामेळा यांचे जीवन ग्रामजीवनाशी निगडित होते. श्रम हा ग्रामजीवनाचा पाया असतो. शेतकरी, श्रमकरी, दलित यांच्या श्रमावर ग्रामीण जीवन उभे असते. चोखोबांच्या भक्तीला इतर संताच्या भक्तीपेक्षा वेगळी धार होती.

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा |
काय भुललासी वरलीया रंगा ||
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा |
काय भुललासी वरलीया रंगा ||

ऊस वेडावाकडा असला तरी त्याचा रस गोड असतो. त्याप्रमाणे आपली जात हीन असली तरी आपला भक्तिभाव प्रामाणिक आहे. माझा देह शुद्ध नाही, मला बोलता येत नाही. पण माझी भक्ती खोटी नाही. दुभंगलेले मन चोखोबांच्या अभंगाचा मूळ गाभा आहे. चोखामेळाच्या काव्यात कृषीसंस्कृतीतील अनेक महत्त्वाचे घटक आले

आहेत. भूक, उपासमार, दारिद्र्य हे कृषिसंस्कृतीतील अदिम सत्य त्यांच्या काव्यात येताना दिसतात.

विठ्ठल हाच सर्वश्रेष्ठ देव आहे. तोच आपला दाता आहे. तो आपला उद्धारकर्ता आहे, असे संत गोरा कुंभार यांना वाटते.

देवा तुझा मी कुंभार | नासी पापांचे डोंगर |
ऐसा संतप्त हो जाती | घडे साधूची संगती ||

संत गोरोबा यांचे व्यक्तिमत्व कमालीच्या शांत होते. त्यामुळे त्यांच्या अभंगात शांत रस पाहावयास मिळतो. कुठेही विद्रोह दिसत नाही. आपला अध्यात्मिक अनुभव सांगत असताना उपमा, रुपके यांचा वापर ते करतात. त्यांच्या या रूपकातूनच शेती संस्कृतीचे अनेक संदर्भ आले आहेत. सावता माळी यांच्या काव्यातून शेती संस्कृतीचे चित्रण आले आहे. शेतीतील मशागतीची कामे, ऋतुमान, पीकपाणी, गुरेढोरे, शेळ्या- मेंढ्या, अशी समग्र कृषीसंस्कृती सावता माळयांच्या काव्यात येते. पिकाचे, विहीर, मोट, नाडा याचे सुंदर वर्णन त्यांच्या काव्यात आले आहे.

कांदा मुळा भाजी |
अवघी विठाबाई माझी ||१ ||
लसूण, मिरची, कोथिंबिरी |
अवघा झाला माझा हरी ||२ ||
मोट,नाडा,विहीर, दोरी |
अवघी व्यापली पंढरी ||३ ||
सावता म्हणे केला मळा |
विठ्ठला पाई गोविला गळा ||४ ||

आपल्या श्रमातून फुललेला हा मळा हे प्रति पंढरपूर आहे. तेथे प्रत्येक पिकात, प्रत्येक वस्तूत पांडुरंग भरून राहिला आहे. तो पिकाच्या रूपाने माझ्या आजूबाजूला आहे. अशी धारणा संत सावता माळयाची आहे. नरहरी सोनार यांनी आपल्या व्यवसायातून विठ्ठलभक्ती सांगितली आहे. हे सांगत असताना रूपकातून शेती व्यवसायातील संदर्भ आले आहेत. शेती संस्कृतीत नातेसंबंध खूप महत्त्वाचे असतात. नातेसंबंधाचे पावित्र्य शेती संस्कृतीत जपले जाते, अशी त्यांची भूमिका अभंगातून दिसते.

संत बहिणाबाईच्या काव्यातून विठ्ठल व भक्त, यांच्यातील एकरूपतेचा प्रत्यय आला आहे, तो असा-

खरा देवामधी देव
पंढरीचा पांडुरंग !
अरे, एकनाथासाठी कसा चंदन घासतो
सावत्याच्या बरोबर
खूर्प हातात धरतो
बोधल्याच्या शेतीमधी
दाने देतो खंडी खंडी

अशा शेतकऱ्यांच्या प्रत्येक श्रमाला विठ्ठल मदत करतो. म्हणूनच पाना-फुलात, त्यांना विठ्ठल दिसतो. पंढरीच्या दिशेने वारा आला तरी विठ्ठलाच्या पावलांच्या आवाजाचा तिला भास होतो. असे कृषीसंस्कृतीचे व विठ्ठलाचे अतूट नाते बहिणाबाईंनी सांगितले आहे.

व्यासपीठाविना कीर्तन ही गाडगेबाबांच्या कीर्तनाचे वेगळेपण होते. एखाद्या मैदानात, एखाद्याच्या अंगणात, नांगरलेल्या शेतात अशी जिथे जागा मिळेल तिथे गाडगेबाबा किर्तन करत असतात. गाडगेबाबांचे कीर्तन सर्वांसाठी खुले असे. शेतकऱ्यांच्या पोरांना ते म्हणत, शेतीमध्ये जो माल पिकतो, धान्य- फळे येतात त्याच्या आधारे तुम्ही एखादा शेती उद्योग म्हणजे कृषिउद्योग का उभा करत नाही. असे झाले तर तुमचे दारिद्र्य नष्ट होईल.

सारांशाने असे म्हणता येईल की, संताचा व शेतीचा जवळचा संबंध राहिला आहे. खेड्यातील अज्ञान, अंधश्रद्धा यावर संतांनी आपल्या काव्यातून भाष्य केले आहे. शेती व शेतकरी जीवनचित्रणाच्या दृष्टीने संतांचे

काव्य महत्त्वाचे आहे. व्यक्ती, कुटुंब, जात, गावगाडा व प्रशासन असे ग्रामजीवनाचे सूत्र असते. सर्व संतांचा व शेतीचा या ना त्या कारणाने संबंध राहिला आहे. यातील संत तुकाराम, संत सावतामाळी हे स्वतः शेतकरी होते. शेतकरी जीवन त्यांनी जळून पाहिले होते. शेतकरी जीवन ते जगले होते. त्यामुळे शेती संस्कृतीचे वास्तव चित्रण त्यांच्या कवितेत येते. शिवाय गोराकुंभार, संत चोखामेळा, संत सेना न्हावी, संत नरहरी सोनार यांनी स्वतः गावकीची कामे केली आहेत. त्यामुळे त्यांच्या काव्यातही शेतीतील अनेक घटकांचे चित्रण येते. त्यामुळे शेतीपासून संतांना बाजूला काढता येत नाही.

**निष्कर्ष:**

१) संत साहित्य केवळ आध्यात्मिक नसून ते एक 'पर्यावरणीय साहित्य' आहे.

२) संत साहित्यातील शेतीदर्शन हे केवळ शेतीचे वर्णन नसून श्रमातून समाधान शोधणारे एक जीवनदर्शन आहे.

३) शेती संस्कृतीत नातेसंबंध खूप महत्त्वाचे असतात. नातेसंबंधाचे पावित्र्य शेती संस्कृतीत जपले जाते.

४) शेतीविषयक अनेक घटकांचे मार्गदर्शक म्हणून तुकारामांचे अभंग आजही उपयोगी पडतात.

५) भूक, उपासमार, दारिद्र्य हे कृषिसंस्कृतीतील अदिम सत्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', ल.रा.नासिराबादकर , फडके प्रकाशन ,कोल्हापूर , जानेवारी २०१५

२) 'संत परंपरा आणि कृषिसंस्कृती', प्रा.डॉ.वामन जाधव, हर्मिस प्रकाशन, पुणे ,फेब्रुवारी २०१७

३) 'भारतीय संतांचे योगदान', स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,२०१५

४) 'तुकारामांचा शेतकरी', डॉ.आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा, २००६

५) 'संत साहित्य : आकलन आणि अध्यापन', म.रा.मा.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ, २०११